कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव ता. जि. लातूर.

स्टाफ अकादमी विभाग

शैक्षणिक वर्ष — २०१७—१८

कार्यक्रम अहवाल

१ ‘‘ निरोप समारंभ व गुणवंताचा सत्कार कार्यक्रम ’’

दि. ०८.०७.२०१७ रोजी महाविद्यालयामध्ये स्टाफ अकादमीच्या वतीने कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे प्रा. अप्रुपल्ले सर हे प्रदिर्घ सेवेनतंर सेवानिवृत्त झाले त्याबद्दल त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला तसेच प्रा. भांजी सरांनी पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल व प्रा. राठोडे मॅडम यांनी अर्थशास्त्र विषयाच्या ( अभ्यासक्रम ) ग्रंथाचे लेखन केले त्याबद्दल त्यांचा स्टाफ अकादमीच्या वतिने गौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम वाघ सरांनी सर्वाना शुभेच्छा दिल्या यासाठी महाविद्यालयातील आधिव्याख्याते उपस्थित होते.

२ कौशल्य वृध्दी अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा

दि. २२.०७.२०१७ रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. राम वाघ सर यांच्या अध्यक्षतेखाली स्टाफ अकादमीच्या वतिने बी. ए. व्दितीय वर्षामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७—१८ पासून नविन कौशल्य वृध्दी अभ्यासाक्रमाची सुरूवात करण्यात आली. या अभ्यासक्रमाबद्दल प्रा. डॉ. शाहुराज मुळे व प्रा. डॉ. दुष्यंत कटारे सर यांनी सविस्तर माहिती दिली या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व अधिव्याख्याते उपस्थित होते.

३ सत्कार समारंभ आणि पेपर वाचन कार्यक्रम

दि.१२.१२.२०१७ रोजी दुपारी १२:०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये प्राचार्य डॉ. राम वाघ सर यांच्या अध्यक्षतेखाली स्टाफ अकादमीच्या वतिने सत्कार समारंभ आणि पेपर वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये इंग्रजी विषयामध्ये पीएच.डी प्राप्त केलेल्या प्रा. सुरेशकुमार कांबळे सर व महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य परिषद आचार्य नंददुलारे बाजपाई पुरस्कार प्राप्त डॉ. रणजित जाधव सर आणि युगप्रवर्तक क्रांतीबा या उत्कृष्ठ ग्रंथाचे संपादन केल्याबद्दल प्रा. डॉ. दुष्यंत कटारे सर यांचाही याठिकाणी गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये प्रा. डॉ. सुरेशकुमार कांबळे सर यांनी शोधनिबंधाचे वाचन केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.